वर्ष : ०५ | अंक: ०७ | मुंबई, मंगळवार ८ जानेवारी २०१९ ते १४ जानेवारी २०१९ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 ५० हून अधिक 'झोपु' योजना विकासक बदलणार ?

3 → सोयीचे प्रश्न, सोयीची उत्तरे !

'केरळ बंद'ला हिंसक वळण ← 4




# आता निवडणूक झाल्यास 'रालोआ'ला बहुमत नाही

## शिवसेनेला मिळणार केवळ ८ जागा

**नवी दिल्ली : लोकसभेची निवडणूक आता झाली, तर भाजपाच्या नेतृत्वाखालील 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'ला (रालोआ) बहुमतासाठी किमान आवश्यक असलेल्या २७२ जागांहून सुमारे १५ जागा कमी मिळतील, असा निष्कर्ष इंडिया टीव्ही-सीएनएक्स यांनी घेतलेल्या एका जनमत चाचणीतून काढण्यात आला आहे. या ताज्या सर्वेक्षणाच्या अंदाजानुसार महाराष्ट्रातील ४८ जागांपैकी भाजपाला २२, शिवसेनेला आठ, तर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी नऊ जागा मिळू शकतील.**



### आघाड्यांचे संभाव्य चित्र

| | |
|---|---|
| रालोआ २५७ | पीएमके १ |
| | एनडीपीपी १ |
| | एआयएन आरसी १ |
| भाजपा- २२३ | एनपीपी १ |
| शिवसेना- ८ | एसडीएफ १ |
| जदयु- ११ | अपना दल १ |
| अकाली दल ५ | एमएनएफ १ |
| लोक जनशक्ती ३ | |

पाच राज्य विधानसभांच्या निवडणुकांनंतर आणि त्यापैकी राजस्थान, छत्तीसगढ व मध्यप्रदेश या तीन राज्यांत काँग्रेसने भाजपाकडून सत्ता हिसकावून घेतल्यानंतर १५ ते २५ डिसेंबर यादरम्यान लोकसभेच्या सर्व ५४३ मतदारसंघांमध्ये ही जनमत चाचणी घेऊन लोकमताचा कौल अजमावण्यात आला. त्यावरून असे दिसते की, आता लोकसभा निवडणूक झाल्यास कोणालाच स्पष्ट बहुमत मिळणार नाही. 'रालोआ'ला २५७ पर्यंत व सपा आणि बसपा वगळून काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'संयुक्त लोकशाही आघाडी'ला (संपुआ) १४६ जागा मिळू शकतील.

अशा त्रिशंकू अवस्थेत सरकार स्थापनेची गुरुकिल्ली या दोन्ही आघाड्यांखेरीज 'इतर' पक्षांच्या हाती असेल व अशा या इतर पक्षांना १४० पर्यंत जागा मिळू शकतील. या 'इतर' पक्षांमध्ये समाजवादी पक्ष, बसपा, अण्णाद्रमुक, तृणमूल काँग्रेस, तेलंगणा राष्ट्र समिती, बिजू जनता दल, वायएसआर काँग्रेस, डावी आघाडी, मेहबुबा मुफ्ती यांचा पीडीपी, बद्रुद्दीन अजमल यांचा आसाममधील 'एआययूडीएफ', असाउद्दीन ओवैसी यांची 'एमआयएम', लोकदल, आम आदमी पार्टी व अपक्षांचा समावेश असेल. विशेष म्हणजे या दोन संस्थांनी मिळून पाच राज्य विधानसभांच्या निवडणुका होण्याआधी नोव्हेंबरमध्ये जी देशव्यापी जनमत चाचणी घेतली होती त्यात 'रालोआ'ला २८१ जागांसह स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता दिसली होती. त्यावेळी 'संपुआ'ला १२४ व 'इतरां'ना १३८ जागा मिळणे अपेक्षित धरले होते. याचा अर्थ असा की, तीन राज्यांमधील पराभवानंतर 'रालोआ'च्या लोकप्रियतेला ओहोटी लागली असून, त्यांच्या जागा आता आधीच्या तुलनेत २४ ने कमी होऊन 'संपुआ'च्या २२ जागा वाढल्याचे चित्र दिसले.

# आरक्षण टिकविण्याची हमी देण्याची मागणी

## मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यांवर मराठा समाजाची नाराजी

**मुंबई - राज्यघटनेनुसार ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण देता येत नाही. सरकारी नोकऱ्याही बेरोजगारीच्या तुलनेत फार उपलब्ध होत नाहीत. पण मराठा समाजाच्या मनाच्या समाधानासाठी अतिरिक्त १६ टक्के आरक्षण दिले, या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याचे पडसाद सकल मराठा समाजाच्या सोलापूर येथे रविवारी झालेल्या बैठकीतही उमटले.**



मराठा समाज या वक्तव्यांमुळे नाराज असून सरकारने राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल जाहीर करावा आणि आरक्षण टिकविण्याची हमी मराठा समाजाला द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ओबीसी समाजातर्फे मराठा आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची तयारीही सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दोन दिवसांपूर्वी नागपूर येथे केलेल्या वक्तव्याचे पडसाद मराठा व ओबीसी समाजातही उमटले आहेत. मराठा समाजाचे आरक्षण घटनाबाह्य आहे, हे राज्याच्या प्रमुखाने जाहीरपणे सांगितल्याने त्याचा उपयोग आरक्षणविरोधी व्यक्तींकडून न्यायालयातही केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे यासंदर्भात मराठा समाज चिंतित आहे. आता सरकारने समाजाचे आरक्षण टिकविण्याची हमी द्यावी, असा ठराव झाल्याचे आरक्षणासाठी पाठपुरावा करणारे अभ्यासक प्रा डॉ बाळासाहेब सराटे यांनी सांगितले. राज्य सरकारने महाभरतीची प्रक्रिया निवडणूक आचारसंहिता सुरू होण्यापूर्वी सुरू करून ३१ मार्चपूर्वी संपवावी, अशी मागणीही सरकारकडे करण्यात आली आहे.

त्याचबरोबर महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांच्याऐवजी मराठा आरक्षणाबाबतच्या याचिकांची जबाबदारी माजी महाधिवक्ता दरायस खंबाटा, ज्येष्ठ वकील व्ही ए थोरात व अन्य वकिलांकडे सोपवावी, याबाबत राज्य सरकारकडे विनंती करण्यात येणार असल्याचे सराटे यांनी सांगितले.

# मुंबईचे वातावरण अत्यंत खराब

## 'सफर'च्या नोंदीनुसार दिल्लीनंतर दुसरा क्रमांक



*मुंबई : गेल्या काही दिवसांपासून मुंबईकरांना कमालीचा गारठा अनुभवास येत असतानाच, दुसरीकडे मात्र मुंबईचे आरोग्य बिघडले आहे. मुंबईच्या वातावरणात धूर, धुके, धूळ यांचे प्रमाण वाढत असून, याच्या मिश्रणामुळे निर्माण होत असलेल्या धूरक्याने मुंबईकरांच्या नाकीनऊ आणले आहेत. महत्त्वाचे म्हणजे, नुकतीच मुंबई शहर आणि उपनगरावर कमालीच्या धूरक्याची नोंद झाली असून, या प्रदूषणाबाबत दिल्ली खालोखाल मुंबईचा क्रमांक आहे.*

मुंबई शहर आणि उपनगरात वाहत असलेली वाहने, सुरू असलेली बांधकामे यांचा हा परिणाम आहे. वाहनांच्या धुरामुळे मुंबईचे प्रदूषण सातत्याने वाढत आहे. 'सफर'च्या शुक्रवारच्या नोंदीनुसार, अंधेरी, मालाड, बीकेसी आणि माझगाव या परिसरात कमालीच्या प्रदूषणाची नोंद झाली आहे. पूर्व उपनगराच्या तुलनेत पश्चिम उपनगरात आणि मुंबई शहरात अधिक प्रदूषण नोंदविण्यात येत आहे. येथील हवामानाचा विचार करता, मुंबईचे किमान तापमान शुक्रवारी १५ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले आहे. राज्यात सर्वात कमी तापमान अहमदनगर येथे ७.६ अंश नोंदविण्यात आले आहे.

### मुंबईच्या हवेचा दर्जा घसरला

**परिसर हवेची गुणवत्ता**



| | |
|---|---|
| अंधेरी ३९२ | वरळी २४४ |
| मालाड ३७८ | भांडुप २२४ |
| बीकेसी ३६६ | बोरीवली १९७ |
| माझगाव ३२१ | (पार्टीक्युलेट मॅटरमध्ये) |
| चेंबूर २५६ | |
| कुलाबा २४५ | |

### शहर हवेची गुणवत्ता

दिल्ली ३६९, मुंबई २८५, अहमदाबाद २१९, पुणे १२८ (पार्टीक्युलेट मॅटरमध्ये)



मुंबई शहराचा विचार करता समुद्र किनाऱ्यावरील वातावरण अदृश्य स्वरूपाचे नोंदविण्यात आले. मरिन लाइन्स, रे रोड, वरळी, महालक्ष्मी, लोअर परळ येथील वातावरणात कमालीचे धुरके निदर्शनास आले. अंधेरीसह मालाडचा विचार करता, मुंबई शहराच्या तुलनेत पश्चिम उपनगरातील धूरक्याचे प्रमाण तुलनेने अधिक नोंदविण्यात आले. येथील वातावरणात अधिकचे धूरके असून, येथील वातावरणही अदृश्य स्वरूपाचे नोंदविण्यात आले.


# भिडे यांच्या बैठकस्थळासमोर घोषणाबाजी:

## जालना पोलिसांचा लाठीमार, ४९ जण ताब्यात

**जालना** - शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्या बैठकीस विरोध करणाऱ्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी रविवारी सकाळी ९.४५ वाजता लाठीमार केला. यानंतर बंदोबस्तात भिडे यांची नियोजित बैठक आर्य समाज भवन येथे पार पडली. याप्रसंगी ताब्यात घेतलेल्या निदर्शकांना पोलिस वाहनात घालून नेत असताना कार्यकर्त्यांनी बैठकस्थळासमोर येऊन जोरजोरात घोषणाबाजी करत अंडे फेकले. यामुळे अजून तणाव निर्माण झाला होता. विविध ठिकाणी होत असलेल्या विरोधामुळे पोलिसांकडून ४९ जणांना ताब्यात घेतले होते.

संभाजी भिडे यांच्या वतीने गडकोट मोहिमेबाबत जनजागृती व बत्तीस मण सुवर्ण सिंहासनाबाबत माहिती देण्यासाठी रविवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस दलित संघटनांसह संभाजी ब्रिगेडकडून विरोध दर्शवला होता. रविवारी सकाळपासूनच शहरातील विविध चौकांत मोठा बंदोबस्त तैनात होता. मात्र बैठक सुरू होण्याच्या अर्धा तास अगोदर १५ ते २० कार्यकर्ते दुचाकीवर घोषणाबाजी देत कार्यक्रमस्थळी पोहोचले. यावेळी विरोध व घोषणाबाजी करणाऱ्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी जोरदार लाठीमार सुरू करीत त्यांना ताब्यात घेतले.

## सौजन्य व्हॉट्सअप




# माझ्याशी चर्चा केल्याशिवाय भूमिका मांडू नका



## राज ठाकरेंची पदाधिकाऱ्यांना तंबी

*मुंबई - संवेदनशील विषयांवर भूमिका व्यक्त करताना माझ्याशी चर्चा केल्याशिवाय भूमिका मांडू नये, अशी तंबीच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिली आहे. ९२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात ज्येष्ठ लेखिका नयनतारा सहगल ह्यांच्या उपस्थितीवरून सुरु असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंनी हा इशारा दिला आहे.*

यवतमाळमध्ये होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनासाठी साहित्य अकादमी पुरस्कारविजेत्या लेखिका नयनतारा सहगल यांना निमंत्रण देण्यात आले होते. या संमेलनाच्या त्या उद्घाटक होत्या. न्यायहक्क आंदोलन समितीचे निमंत्रक देवानंद पवार आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी इंग्रजी लेखिका असल्याच्या कारणावरून सहगल यांना विरोध दर्शवला होता.

मराठी साहित्यिक हे आपल्या राज्यातच नाहीत तर देशभरात आहेत. त्यांचे साहित्यही देशभरात वाचले जाते, असे असतानाही मराठी साहित्य संमेलनाला इंग्रजी साहित्यिकांना का बोलावलं जातं आहे? असा प्रश्न मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला होता. या वादानंतर नयनतारा सहगल यांचे निमंत्रण रद्द करण्यात आले होते. यावरुनही मोठा वादंग निर्माण झाला. सोमवारी सकाळी राज ठाकरे यांनी याबाबत भूमिका स्पष्ट केली. नयनतारा सहगल यांच्या सारख्या ज्येष्ठ लेखिका जर संमेलनात येणार असतील आणि त्यांच्यासमोर जर मराठी साहित्याची समृद्ध परंपरा खुली होणार असेल आणि त्या जर ही परंपरा जगासमोर नेण्याच्या प्रक्रियेत एक वाहक असतील तर मला अथवा माझ्या पक्षाला आक्षेप असायचे कारणच नाही, असे त्यांनी सांगितले.

# ड्रायव्हिंग लायसन्स आधारशी लिंक करावे लागणार

**नवी दिल्ली** - केंद्र सरकार बनावट परवान्यांना लगाम घालण्यासाठी लवकरच वाहन चालवण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) आधारशी जोडणे (लिंक) अनिवार्य करणार आहे.



सरकार लवकरच वाहनचालक परवान्याला आधार कार्ड संलग्न करणे अनिवार्य करणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांनी दिली. आम्ही लवकरच एक कायदा आणणार असून, त्यायोगे वाहनचालक परवान्याला (ड्रायव्हिंग लायसन्स) आधार संलग्न करणे अनिवार्य करण्यात येईल, असे विधि, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान खात्याचे मंत्री असलेले प्रसाद यांनी येथे सुरू असलेल्या १०६व्या विज्ञान काँग्रेसमध्ये केलेल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले.

सध्या असे होते की, अपघात करून पळून जाणारी दोषी व्यक्ती दुय्यम (डुप्लिकेट) परवाना मिळवतो. यामुळे त्याला सहीसलामत सुटून जाणे शक्य होते. मात्र, परवान्याला आधार कार्ड संलग्न केल्यास, तुम्ही तुमचे नाव बदलू शकता, परंतु डोळ्यांची बुबुळे किंवा बोटांचे ठसे असे बायोमॅट्रिक्स बदलू शकत नाही. त्यामुळे तुम्ही डुप्लिकट लायसन्स घेण्यासाठी गेलात, की या व्यक्तीजवळ आधीच चालक परवाना असून त्याला नवा परवाना दिला जाऊ नये असे यंत्रणा सांगेल, अशा शब्दांत प्रसाद यांनी आधार संलग्न करण्याची कारणमीमांसा स्पष्ट केली.

# ५० हून अधिक 'झोपु' योजना विकासक बदलणार?

**मुंबई - झोपडपट्टी पुनर्विकासासाठी इरादापत्र घेऊनही प्रत्यक्षात गेल्या दहा वर्षापासून काहीही कार्यवाही न झालेल्या ५० हून अधिक योजनांमधील झोपडवासीय विकासक बदलण्याच्या प्रतीक्षेत आहेत. विकासक बदलताना विधायक भूमिका घेण्याचा पवित्रा प्राधिकरणाने घेतल्यामुळे अनेक सुनावण्या फारशा पुढे सरकू शकलेल्या नाहीत. काही योजनांना अभय दिल्याचीही प्राधिकरणात चर्चा ऐकायला मिळत आहे.**



झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर झाल्यानंतर विकासकाला इरादापत्र जारी केले जाते. त्यानंतर योजनेचे काम सुरू करणे आवश्यक असते; परंतु विविध कारणे पुढे करीत या योजना रखडवल्या जातात. अशा काही योजनांमध्ये झोपड्याही तोडलेल्या आहेत आणि झोपडवासीयांना भाडे दिले जात आहे. कालांतराने भाडे देणेही बंद केले जाते. याबाबत पाठपुरावा करूनही झोपडवासीयांना कोणीही वाली राहत नाही. अशा वेळी संबंधित विकासकाला झोपडपट्टी कायदा १३ (२) अन्वये नोटीस दिली जाते. या प्रकरणी सुनावणी घेतली जाते आणि नंतर विकासकाला काढून टाकण्याची कारवाई केली जाते.

या कारवाईला उच्चस्तरीय समिती व नंतर उच्च न्यायालयात आव्हान दिले जाते. या दोन्ही यंत्रणांनी शिक्कामोर्तब केल्यानंतरच विकासक काढण्याची कारवाई केली जाते आणि पुन्हा नव्याने निवड प्रक्रिया राबविली जाते. या संपूर्ण प्रक्रियेला विलंब लागत असल्यामुळे किमान विकासक बदलण्याची कारवाई वेगाने होण्याची आवश्यकता असल्याचे बोलले जात आहे. दहा वर्षे किंवा अधिक काळ झालेल्या तब्बल ११४ योजनांची यादी प्राधिकरणाने तयार केली होती. या सर्व योजनांना नोटिसा पाठविण्यात आल्या होत्या.

या सर्व योजनांबाबत सुनावणी घेणे आवश्यक होते; परंतु काही योजना जाणीवपूर्वक वगळण्यात आल्याचे कळते. काही ठरावीक योजनांमध्ये राजकीय दबाव आल्यानेही त्यात विकासक बदलण्यात आले.

झोपडपट्टी कायदा १३(२) अंतर्गत कारवाईचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबत प्राधिकरणाचे सचिव तसेच तीन उपजिल्हाधिकाऱ्यांकडे आहेत. मात्र याबाबतची आकडेवारी प्राधिकरणाकडे उपलब्ध नाही. या प्रकरणी दररोज सुनावणी होते, असेही एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. एकीकडे नव्या योजनांना मंजुरी मिळत असली तरी जुन्या योजनांबाबत ठोस निर्णय घेतला जात नसल्याची अनेक झोपडीवासीयांची तक्रार आहे. केवळ विकासक बदलणे हाच प्राधिकरणाचा हेतू नाही. झोपडपट्टी कायदा १३(२) अंतर्गत कारवाई ही अर्धन्यायिक स्वरूपाची असते. त्यामुळे झोपु योजनांच्या प्रगतीचा आढावा घेत असते आणि जेथे आवश्यकता असेल तेथे या कायद्याचा वापर केला जातो. मात्र त्या वेळी आवश्यक ती काळजी घेतली जाते. १३(२) अंतर्गत नियमित सुनावण्या होत असतात आणि झोपडवासीयांचे हित डोळ्यासमोर ठेवून कारवाई केली जाते.

# प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाईची शिफारस

**मुंबई** - पदनाम-वेतनश्रेणी गैरव्यवहारात वित्तविभागाला अंधारात ठेवून शासन निर्णय काढणाऱ्या, गैरप्रकारात सहभागी असलेल्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी शिफारस सातव्या वेतन आयोग लागू होण्याच्या पार्श्वभूमीवर नेमलेल्या बक्षी समितीने केली आहे. सातव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करण्यापूर्वी चुकीच्या वेतनश्रेणी पूर्ववत करून वसुली करण्यात यावी असेही समितीने नमूद केले आहे.



राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, जळगावचे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, अमरावतीचे संत गाडगेबाबा विद्यापीठ, औरंगाबादचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ आणि गडचिरोलीचे गोंडवाना विद्यापीठ या विद्यापीठांनी काही कर्मचाऱ्यांची पदनामे बदलताना त्यांना चुकीच्या पद्धतीने वेतनश्रेणी वाढवून दिली. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर सहाशे कोटी रुपयांपेक्षा अधिक भार पडत होता. के. पी. बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या वेतन सुधारणा समितीच्या अहवालात या गैरप्रकाराचा उल्लेख करून अतिरिक्त वेतनाची वसुली करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर प्रशासनातील जे अधिकारी या प्रकरणात गुंतले होते त्यांच्यावरही शिस्तभंगाची कारवाई करावी अशी शिफारस समितीने केली आहे. सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चितीपूर्वी पदनाम-वेतनश्रेणी घोटाळ्यातील अधिकाऱ्यांच्या वेतनाची जुन्या रचनेनुसार निश्चिती करून वसुली करण्यात यावी, असे या समितीने म्हटले आहे.



# दादर-कल्याण मार्गावरही एसी लोकल धावणार?

**मुंबई** - मुंबईकरांचा प्रवास गारेगार व्हावा, यासाठी १२ वातानुकूलित (एसी) लोकल मुंबई रेल्वेवर दाखल होणार आहेत. यापैकी मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेला प्रत्येकी सहा एसी लोकल मिळणार आहेत. मध्य रेल्वेवर दाखल होणाऱ्या सहापैकी चार एसी लोकल दादर-कल्याण मार्गावर तर एक लोकल हार्बर मार्गावर धावण्याची शक्यता आहे. उर्वरीत एक लोकल कारशेडमध्ये राखीव ठेवणार असल्याची माहिती रेल्वे सूत्रांनी दिली.

एसी लोकल वर्षभरात टप्प्याटप्प्याने मार्गस्थ करण्यात येणार आहेत. यापैकी मध्य रेल्वेवर दुसरी, तिसरी, सातवी, आठवी, अकरावी आणि बारावी एसी लोकल दाखल होईल. पश्चिम रेल्वेवर पहिली, चौथी, पाचवी, सहावी, नववी आणि दहावी लोकल दाखल होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

## थोडक्यात महत्वाचे

### गॅस सिलिंडर स्फोटात चिमुरडीचा मृत्यू



**मुंबई** - कुर्ला येथील बैल बाजार परिसरातील घरात गुरुवारी सायंकाळी स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. त्यात चार वर्षांच्या मुलीचा होरपळून मृत्यू झाला तर एक तरुण गंभीर जखमी झाला. बैल बाजारातील क्रांतीनगर येथे गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास ही दुर्घटना घडली. गॅस सिलिंडरचा स्फोटामुळे घराला आग लागली. यावेळी घरात अनुष्का चौरसिया (४) ही एकटीच होती. तिचा होरपळून मृत्यू झाला आहे. तर रवी परमार (२१) हा तरुण जखमी झाला. अरुंद गल्ल्यामुळे अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी पोहचण्यात अडचणी येत होत्या. अखेर विमानतळावरील अग्निशमन दलाने विमानतळ परिसरातून आगीवर नियंत्रण मिळवले. याबाबत विनोबा भावेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### चेंबूरमध्ये बिल्डरची गोळी झाडून आत्महत्या



**मुंबई** - प्रकल्प रखडल्यानं मानसिक तणावाखाली असलेल्या चेंबूर येथील बिल्डरनं स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना शनिवारी सकाळी घडली. संजय अग्रवाल (वय ५७) असं या बिल्डरचं नाव आहे. चेंबूर पोलीस या घटनेचा तपास करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बिल्डर संजय अग्रवाल हे चेंबूरच्या सिंधी कॉलनीतील संजोना कॉम्प्लेक्स या इमारतीत कुटुंबासह राहत होते. एका प्रकल्पाचे काम रखडल्यानं ते मानसिक तणावाखाली होते. त्यांनी शनिवारी सकाळी ११.२५ वाजताच्या सुमारास घरातच स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस त्यांच्या घरी पोहोचले. त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन राजावाडी रुग्णालयात विच्छेदनासाठी पाठवला. चेंबूर पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे.

### सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या अडचणीत वाढ

**मुंबई** - महाराष्ट्र सरकारमध्ये सहकारमंत्री असलेल्या सुभाष देशमुख यांना सेबीने जबरदस्त दणका दिला आहे. गुंतवणुकदारांचे ७५ कोटी रुपये परत न केल्याने देशमुख यांच्या लोकमंगल संस्थेची खाती गोठवण्याचे आदेश सेबीने दिले आहेत. त्यामुळे सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या अडचणीत वाढ होण्याची होण्याची शक्यता आहे. सहकारमंत्री सुभाष देशमुख यांची मालकी असलेल्या लोकमंगल समुहाने गुंतवणुकदारांकडून घेतलेले ७५ कोटी रुपये तीन महिन्यांत परत करावेत, असे आदेश सेबीने दिले होते. मात्र हे पैसे विहीत कालावधीत परत करण्यात न आल्याने अखेर सेबीने लोकमंगल समुहावर कारवाई केली आहे.

# पोलिसांवर हल्ला करणारे सहा आरोपी अटकेत

**मुंबई - अंबोली पोलिसांवर हल्ला करणाऱ्या जमावापैकी सहा जणांना गुरुवारी बेड्या ठोकण्यात आल्या. पोलिसांनी मारहाण केल्याचा बनाव करून जमावाला चिथावणाऱ्या नोमान खारोडीया या तरुणाचाही त्यात समावेश आहे. जमावातील उर्वरित आरोपींची शोधाशोध सुरू असून त्यांना लवकरच अटक होईल, असे पोलिसांनी सांगितले.**



या हल्ल्याची गंभीर दखल वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घेतली असून आरोपींविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना अंबोली पोलिसांना दिल्या आहेत.

जोगेश्वरी रेल्वे स्थानकाजवळील एस. व्ही. मार्गावरील चौकात बुधवारी नाकाबंदी करून वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरोधात अंबोली पोलीस कारवाई करत होते. पेशाने व्यावसायिक असलेल्या नोमानला विनाहेल्मेट दुचाकीवरून आल्याने नाकाबंदीत थांबवण्यात आले. दुचाकीला अडकवलेले हेल्मेट दाखवून त्याने पोलिसांशी हुज्जत घातली. पळून जाण्यासाठी त्याने पोलीस शिपाई सागर कोंडविलकर याच्या हातावर दुचाकीच्या चावीचा फटका मारला. त्यामुळे सागरच्या हातातून रक्त येऊ लागले. पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या नोमानला सागरने पकडले. तेव्हा त्याच्या हातावरील रक्त नोमारच्या शर्टला लागले. ते पाहून नोमानने पोलिसांनी मारल्याचा बनाव रचला. जमावाला चिथवले. पुढे जमावाने हल्ला केला. त्यात सागरसह अंबोलीचे पोलीस निरीक्षक गंभीर जखमी झाले.

नोमानसह जमावाविरोधात दंगल, सरकारी कामात अडथळा, सरकारी कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्याला मारहाण या कलमांनुसार गुन्हा नोंदवला. गुरुवारी नोमानसह सहा जणांना अटक केल्याची माहिती, अंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक भारत गायकवाड यांनी दिली.

## 'मुंबई मेट्रो ३' च्या कामाने नागरिक हैराण

**मुंबई** - सध्या संपूर्ण मुंबईत मेट्रोचं काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. यामुळे मुंबईकरांना प्रचंड वाहतुक कोंडीचा सामना करावा लागत आहे. मेट्रोचं काम सकाळपासून रात्रीपर्यंत करण्याचा निर्णय यंत्रणेकडून घेण्यात आला होता. मात्र तरीही काही भागात मध्यरात्रीही मेट्रोचं काम सुरू असल्यामुळे मेट्रो शेजारी राहणाऱ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

अनेकांनी ट्विटरवरुन याबद्दल तक्रार करुनही प्रशानसनाकडून कोणत्याही प्रकारचं उत्तर देण्यात आलेलं नाही. ऑरेलियस प्रसाद या ट्विटर युझरने नुकताच एक व्हिडिओ ट्विटरवर शेअर केला. यात त्यांनी मध्यरात्रीही अंधेरी पूर्व येथील मरोळ भागात मेट्रो ३ चं काम चालल्यामुळे नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्याचं स्पष्ट म्हटलं आहे. रात्री पाऊणलाही जर काम सुरू राहिले तर आम्हाला शांतता कधी मिळणार? असा प्रश्न त्यांनी ट्विटरच्या माध्यमातून अश्विनी भिडे यांना विचारला.

## मोदींना टक्कर देण्यासाठी 'पॉवर'प्लॅन

### मुंबईत राष्ट्रवादीच्या बैठकीला सुरूवात

***मुंबई - आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने रणनीती ठरवण्यासाठी शरद पवार यांच्या अध्यक्षेखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीला सुरुवात झाली आहे. आघाडीत आपल्या वाट्याला आलेल्या २४ जागांचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रवादीची बैठक होत आहे.***



राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वा ही बैठक सुरू आहे. आघाडीत आपल्याला मिळालेल्या कोणत्या जागा मित्रपक्षांना सोडाव्यात, तसंच कोणत्या मतदारसंघात कोणता उमेदवार प्रभावी ठरेल, यावर राष्ट्रवादीच्या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या जागावाटपाचा तिढा अखेर सुटला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी दोन्ही पक्षांनी ५०-५० च्या फॉर्म्युल्यावर शिक्कामोर्तब केलं आहे.

काँग्रेस आणि राष्ट्रवादी लोकसभेच्या प्रत्येकी २४ जागा लढवणार हे आता नक्की झालं आहे. तसंच त्यातील दोन्ही पक्ष आता आपल्या वाट्यातून मित्रपक्षांना काही जागा देणार आहेत. राज्यात भाजपविरोधात महाआघाडी करण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न सुरू होते. बऱ्याच बैठकानंतर दोन्ही पक्षांचं आता जागावाटपावर एकमत झालं आहे.

***आघाडीतील मित्रपक्षांची मागणी***

समाजवादी पार्टी मुंबईत एक जागा मागते आहे. त्यामुळे नेमकी कोणती जागा द्यायची यावरू काँग्रेसची गोची झाली आहे. विद्यमान प्रिया दत्त यांची जूनी जागा तर उत्तर मध्य मुंबई लोकसभा जागा समाजवादी पार्टी मागत आहे. तर दुसरीकडे राजू शेट्टी यांना हातकणंगलेसोबत बुलढाणा लोकसभा मतदार संघ हवा आहे, पण त्यास राष्ट्रवादी अनुकूल नाही.

पालघर लोकसभा मतदार संघाची जागा बहुजन विकास आघाडी, भिवंडी इथल्या जागेसाठी मुसि.म उमेदवार द्यावा याचा विचार करत काँग्रेस स्वत: अथवा समाजवादी पार्टीला देण्याच्या तयारीत असल्याचं सांगण्यात आहे.

## एसटी लवकरच मालवाहतुकीत




**मुंबई** - एसटी महामंडळ उत्पन्नवाढीसाठी मालवाहतूक सेवा आणि गोदाम व्यवसायात उतरणार आहे. त्यासाठी तीन हजार जुन्या बसचे मालवाहतूक वाहनांत रूपांतर करण्याबरोबरच नवीन मालवाहतूक वाहनेही खरेदी करण्यात येणार आहेत.

पडून असलेल्या ३०१ जागांवर गोदामे सुरू करण्यात येतील, अशी माहिती एसटी महामंडळाने दिली. सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागार कंपनीने याबाबतचे सादरीकरण गुरुवारी सह्याद्री अतिथिगृहात केले. याबाबतच्या प्रस्तावात परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी काही सुधारणा सुचविल्या. बैठकीला एसटीचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल व अन्य वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. मालवाहतूक सेवेत शिधावाटप दुकानांना पुरवण्यात येणारे धान्य, पोषण आहाराचे धान्य आदींची वाहतूक करण्याचाही प्रस्ताव आहे.

या सेवेसाठी स्वतंत्र वाहनेही वापरण्यात येणार आहेत. प्रवासी बसचे नऊ वर्षांनंतर सर्व तांत्रिक बाबी पडताळून मालवाहतूक वाहनांमध्ये रूपांतरण करण्यात येईल. परिवहन विभागाची रीतसर मान्यता घेऊनच वाहने मालवाहतुकीसाठी वापरण्यात येतील.

# बालमृत्यू रोखण्यासाठी 'बेबी केअर किट'



**मुंबई** - राज्याचे आरोग्य व सामाजिक स्थितीचे मोजमाप हे बालमृत्यू दरावरून ठरतात. हे बालमृत्यू रोखण्यासाठी तसेच अर्भकमृत्यू रोखण्यासाठी महिला व बालविकास विभागाने पाच लाख आदिवासी अर्भकांना 'बेबी केअर किट' देण्याची योजना हाती घेतली आहे. तमिळनाडू व तेलंगणापाठोपाठ अशा प्रकारे बेबी केअर किट देणारे महाराष्ट्र हे देशातील तिसरे राज्य आहे.

आरोग्य विभाग तसेच महिला व बालविकास विभागाकडून बालकांच्या आरोग्यासाठी अनेक योजना राबविल्या जातात. त्यातही महिला व बालविकास विभागाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असून शून्य ते सहा वयोगटाच्या बालकांना पोषण आहार देणे, त्याचे नियमित वजन घेऊन सॅम व मॅम वजनी गट निश्चित करून बालकांच्या आरोग्याची देखभाल करणे तसेच गर्भवती व स्तनदा मातांना पोषण आहार देण्याचे काम हा विभाग करीत असतो. राज्यात सध्या ९७ हजार अंगणवाडी व १३ हजार मिनी अंगणवाड्या असून यात सुमारे ७३ बालकांना पोषण आहार व आरोग्याची तपासणी केली जाते. पूर्वशालेय शिक्षण देण्याची प्रमुख जबाबदारीही आहे. जी बालके ही एक वर्षांच्या आतील आहेत त्यांच्या आरोग्याची विशेष पद्धतीने काळजी घेणे आवश्यक असून केवळ पोषण आहार मिळणे एवढ्यापुरते ते मर्यादित नाही. एक वर्षांच्या आतील बालकांच्या मृत्यूची बरीच कारणे असून यात आईचे बालसंगोपनाविषयी असलेले अपुरे ज्ञान, राहण्याच्या ठिकाणची परिस्थिती, स्वच्छ पाणी तसेच संसर्गजन्य रोगांना प्रतिबंध करणे आणि लसीकरण करून रोगप्रतिबंधक शक्ती वाढविणे आवश्यक असते.

या पार्श्वभूमीवर तमिळनाडू व तेलंगणाच्या धर्तीवर नवजात बालकांना 'बेबी केअर किट' देण्याचा निर्णय खात्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी घेतला. पहिल्या टप्प्यात केवळ आदिवासी जिल्ह्यांपुरताच हा मर्यादित ठेवण्यात आला आहे.

# अल्पवयीन मुलीला गर्भपाताची परवानगी

**मुंबई** - शेजाऱ्याने बलात्कार केल्याने शरीरावर आघात झालेला असतानाच पुढे गर्भवतीही राहिल्याने प्रचंड मानसिक तणावाखाली असलेल्या अवघ्या १४ वर्षीय मुलीला मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी दिलासा दिला. २४ आठवड्यांचा गर्भ राहिलेल्या या मुलीला गर्भपात करण्यास उच्च न्यायालयाने परवानगी दिली असून, या संदर्भात जे.जे. रुग्णालयाच्या डॉक्टरांच्या पथकाला आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देशही दिले आहेत.



गर्भपाताशी संबंधित कायद्यान्वये गर्भधारणा २० आठवड्यांहून अधिक काळाची झाल्यास गर्भपात करण्यास प्रतिबंध आहे. अशा प्रकरणांत गर्भपात करणे गरजेचे असल्यास विशेष समितीमार्फत परवानगी मिळवण्याची तरतूद कायद्यात आहे. मात्र, अशी समिती स्थापन झालेली नसल्याने मानखुर्दमधील या मुलीच्या पालकांनी ॲड. मीनाझ ककालिया यांच्यामार्फत रिट याचिका करून उच्च न्यायालयाची परवानगी मागितली होती. मागील महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात त्यांनी सुटीकालीन न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर या मुलीचा गर्भपात करणे सुरक्षित आहे का, याविषयी अहवाल सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने जे. जे. रुग्णालयाच्या मेडिकल बोर्डाला दिले होते. त्यानुसार, बोर्डाने गुरुवारी न्या. भूषण धर्माधिकारी व न्या. रेवती मोहिते-डेरे यांच्या खंडपीठासमोर मुलीचा गर्भपात करणे शक्य असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर, 'बलात्कारामुळे गर्भधारणा झालेली असल्याने या मुलीच्या मानसिक आरोग्यावर मोठा आघात होऊ शकतो. त्यामुळे तिला कायद्यानुसार वैद्यकीयदृष्ट्या गर्भपात करण्यास परवानगी देण्यात येत आहे', असा आदेश खंडपीठाने दिला. तसेच, गर्भपाताची प्रक्रिया जे.जे. रुग्णालयात करण्यात यावी, असे निर्देश देत मेडिकल बोर्डाला आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देशही दिले.

# थकबाकीचा भार, त्यात कोर्टबाजीचा भुर्दंड

## वसुलीसाठी एमएमआरडीएची दमछाक

**मुंबई** - विविध कंपन्या तसेच लीजधारकांकडील सुमारे दोन हजार कोटी रुपयांची थकबाकी वसूल करताना एमएमआरडीएची दमछाक झाल्याचे दिसत आहे. थकबाकीची वसुली तर दूरच, उलट कोर्टबाजीपोटी दीड कोटी रुपयांचा भुर्दंड सोसावा लागला आहे. या कंपन्या तसेच लीजधारक एमएमआरडीएच्या विरोधात न्यायालयात गेले आहेत.

आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी एमएमआरडीए प्रशासनाकडे एमएमआरडीएच्या 'जी ब्लॉक' अंतर्गत मेसर्स रिलायन्स, इंडियन न्यूजपेपर्स सोसायटी, नमन हॉटेल आणि अन्य लीजधारकांनी न्यायालयात दाखल केलेले दावे तसेच या दाव्यांच्या सुनावणीवर होणाऱ्या खर्चाची माहिती मागितली होती. त्यावर मुकेश अंबानी यांची रिलायन्स इंडस्ट्रीज, मेसर्स नमन हॉटेल, रघुलीला बिल्डर्स लिमिटेड आणि इंडिया न्यूजपेपर्स सोसायटीने एमएमआरडीए प्रशासनाच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे, अशी माहिती एमएमआरडीएच्या विधी शाखेने दिली. एमएमआरडीच्या वतीने न्यायालयात दाव्यात बाजू मांडण्यासाठी वकिलांना आतापर्यंत दीड कोटी रुपये देण्यात आले आहेत. सर्वप्रथम रघुलीला बिल्डर्स लिमिटेड ने २६ सप्टेंबर २०१७ रोजी एमएमआरडीए प्रशासनाला कोर्टात खेचले. त्यानंतर श्री नमन हॉटेल्सने १२ ऑक्टोबर २०१७, इंडिया न्युजपेपर्स सोसायटीने २९ नोव्हेंबर २०१७, तर मेसर्स रिलायन्स इंडस्ट्रीने ३० नोव्हेंबर २०१७ रोजी याचिका दाखल केली आहे.

वांद्रे कुर्ला संकुलात एमएमआरडीने संबंधितांना दिलेल्या भूखंडावर विहित मुदतीत बांधकाम पूर्ण न केल्यास अतिरिक्त प्रीमियम अदा करावा लागतो. तसेच अतिरिक्त एफएसआयचे शुल्क अदा करणे बंधनकारक आहे. पण एमएमआरडीए प्रशासनाला पैसे अदा करण्याऐवजी लीजधारकांनी न्यायालयात धाव घेतली आहे.

## संपादकीय...



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

# सोयीचे प्रश्न, सोयीची उत्तरे !

नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी प्रसारित झालेली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मुलाखत अनेक अर्थानी महत्त्वाची आहे. मोदी यांच्या प्रतिमेचा डोलारा प्रसिद्धीच्या आणि प्रसारमाध्यमांच्या जोरावर उभा असला तरी व्यक्तिश: ते माध्यमांशी संवाद साधण्याबाबत फारच उदासीन आहेत. मधल्या काळात त्यांनी निवडक वृत्तवाहिन्यांना काही मुलाखती दिल्या, परंतु लेखी प्रश्नावर दिलेली छापील उत्तरे यापलीकडे त्यांना फार अर्थ नव्हता आणि यापूर्वीच्या मुलाखतींमधून सरकारी योजनांची जंत्रीच मोठ्या प्रमाणावर असायची. आताची मुलाखत त्यापेक्षा वेगळी होती. २०१४च्या आधी भारतीय जनता पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून नावाची घोषणा झाल्यानंतर त्यांची हवा तयार झाली होती, तेव्हाही मोदींनी पहिली मुलाखत एएनआयच्या स्मिता प्रकाश यांनाच दिली होती. आणि आता पाच वर्षांनी आपली भूमिका पोहोचवण्यासाठी त्यांचीच निवड केली. मुलाखत ऐकल्या आणि पाहिल्यानंतर ही निवड का केली, याचे उत्तर मिळते. खासगी वाहिनीला मुलाखत दिल्याचा आभास निर्माण करून आपल्याला हवे तेवढे, हवे तसे सांगण्याची



मुभा घेण्याचा हेतू त्यातून स्पष्ट होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मुलाखत म्हणजे काही चटपटीत, आक्रमक ऐकायला मिळेल अशी अपेक्षा बाळगणाऱ्यांची मात्र या मुलाखतीने निराशा झाली असणार. मोदी यांच्या गेल्या साडेचार वर्षातील कारकीर्दीबाबत लोकांच्या मनात अनेक प्रश्न होते आणि आहेत. त्यांच्या कार्यशैलीबाबत, त्यांच्या वर्तन व्यवहाराबाबत, सरकारच्या कामगिरीबाबत अनेकांच्या मनात शंका आहेत. यापैकी बहुतेक महत्त्वाचे प्रश्न विचारले गेले, परंतु त्या प्रश्नांचा उद्देश वस्तुस्थिती जाणून घेण्याचा नव्हे, तर मोदींना खुलासा करण्याची संधी देण्याचा होता. कारण विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मोदी अत्यंत शांतपणे, संयमितपणे देत होते. त्या उत्तरांनी समाधान होत नव्हते किंबहुना अनेक उपप्रश्नही तयार होत होते, परंतु ते विचारलेच गेले नाहीत. यावरून ही मुलाखत एखाद्या नीटपणे आखणी केलेल्या पटकथेसारखी बेतीव असल्याचे स्पष्ट होते. मोदी यांच्याकडे उत्तम संवादकौशल्य असल्याने काही प्रश्नांची उत्तरे त्यांनी मुत्सद्दीपणे दिली, तर काही प्रश्नांना सोयीने बगल दिली. विशेष उल्लेख करावा लागेल, तो अयोध्येतील राम मंदिराच्या प्रश्नावरील उत्तराचा. गेले काही आठवडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद या परिवारातल्या संस्था आणि शिवसेना या सरकारमधील पक्षाने राम मंदिरावरून जे रान उठवले आहे, त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान काय बोलतात याची उत्कंठा होती. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच सरकार म्हणून आमची जी काही जबाबदारी असेल त्या दिशेने प्रयत्न करण्यात येतील, असे सांगून त्यांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास असल्याचे सूचित केले. राफेलच्या व्यवहारावरून काँग्रेसकडून आणि विशेषत: काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांच्याकडून होत असलेल्या आरोपांवरील प्रश्नाला बगल देताना त्यांनी हे आरोप व्यक्तिश: आपल्यावर नव्हे, तर सरकारवर होत असल्याचे सांगताना, त्यांना (राहुल गांधी) बोलण्याचा आजार आहे, परंतु मला खूप कामे करावयाची आहेत, अशी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. अर्थातच, हे काही त्या प्रश्नाचे उत्तर नव्हते. सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे, हे खरे असले तरी या प्रश्नावर संयुक्त संसदीय समिती स्थापन करण्यापासून अनेक उपप्रश्न विचारून तपशील जाणून घेता आले असते. परंतु सांगणाऱ्यांना सांगायचे नव्हते आणि विचारणाऱ्यांना विचारायचे नव्हते. किंवा पटकथेमध्ये त्याचा अंतर्भाव नव्हता, असेही म्हणावे लागेल. काँग्रेसला लक्ष्य करताना त्यांनी 'नॅशनल हेरॉल्ड' प्रकरण, राम मंदिराच्या खटल्यात कपिल सिब्बल वगैरे वकिलांचा सहभाग आदींचा उल्लेख केला. नोटाबंदी प्रश्नाचीही अशीच वासलात लावण्यात आली. नोटाबंदी हा झटका नव्हता, हे चमकदार वाक्य म्हणून ठीक आहे. परंतु नोटाबंदीनंतर उद्योग-व्यवसायांपासून रोजगारापर्यंत झालेले परिणाम आणि बँकेच्या रांगेत गेलेले शंभरावर लोकांचे बळी यासंदर्भात काहीच विचारण्यात आले नाही, हे आश्चर्यकारक म्हणावे लागेल. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचेही तसेच म्हणता येईल. उत्तर प्रदेश विधानसभेची निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, तेव्हा मोदीच पंतप्रधान होते. तेव्हा ते शेतकऱ्यांच्या हिताचे होते, तर मग मध्यप्रदेश, राजस्थान या राज्यांतील शेतकऱ्यांना आता दिलेली कर्जमाफी ही फसवणूक आहे, असे कसे म्हणता येईल? प्रश्न आमचे आणि उत्तरेही आमचीच, असे या मुलाखतीचे स्वरूप होते. सरकारच्या कामाचा हिशेब देणे म्हणजे सोयीच्या प्रश्नांना, सोयीच्या माध्यमातून, सोयीची उत्तरे देणे नव्हे, हे लक्षात घ्यावयास हवे!

# हेल्मेटचे भूत आताच का?



*नववर्षापासून पुण्यासह अनेक शहरात दुचाकीस्वारांवर हेल्मेटसक्ती करण्यात आली असून, हेल्मेट न वापरणाऱ्यांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई करून त्यांच्याकडून प्रत्येकी ५०० रुपये वसूल करण्यात येत आहे. सवाधिक दुचाकी असलेल्या पुण्यात याविरोधातील आवाज मोठा आहे. हेल्मेटविरोधी कृती समितीने त्याला विरोध करण्यासाठी सविनय कायदेभंग करीत मोर्चा काढला. या समितीने हेल्मेटसक्ती करण्याबाबत अनेक मुद्दे उपस्थित केले आहे. त्यातील काही मुद्द्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.*

हेल्मेटसक्तीबाबतचा हा विषय आजचा नाही तर तब्बल १६ वर्षे जुना आहे. सिम्बायोसिस विधी महाविद्यालयातील भारद्वाज व त्याच्या सहकाऱ्यांनी शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष अनुभव म्हणून उच्च न्यायालयात वाढते अपघात रोखण्यासाठी हेल्मेटसक्ती करावी अशी मागणी करणारी जनहित याचिका २००३ मध्ये दाखल केली होती. त्यावर उच्च न्यायालयाने पोलिसांना फटकारत सुरक्षेसाठी सर्व रस्त्यांवर दुचाकीस्वारांना हेल्मेट सक्तीचे करण्यात आले. या अगोदर मोटार वाहन कायद्यानुसार महापालिका क्षेत्रात हेल्मेटसक्ती नव्हती. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर शासनाने आदेश काढून मोटार वाहन कायद्यात बदल केला व महापालिका क्षेत्रातही हेल्मेटसक्ती लागू केली. त्यानंतर दर काही वर्षांनी हेल्मेटचे भूत ऐरणीवर येते. यंदा हे हेल्मेटचे भूत पुन्हा ऐरणीवर येण्याचे कारणही उच्च न्यायालय आहे. रस्ता सुरक्षा अपघात कमी व्हावेत यासाठी शासनाने काय उपाय योजना केल्या आहेत? अशी उच्च न्यायालयाने विचारणा केली असून, त्याबाबतचा अहवाल देण्याचा आदेश दिला आहे. शासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार : १५ जानेवारीला परिवहन विभागाला हा अहवाल न्यायालयात सादर करायचा आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांमध्ये परिवहन विभाग खडबडून जागा झाला. महाराष्ट्रात सर्वाधिक रस्ते अपघात होतात. पहिल्या तीन क्रमांकांमध्ये महाराष्ट्र असतो. वारंवार अपघात होणाऱ्या ठिकाणामध्ये कशामुळे अपघात होतात, याचा शोध घेऊन उपाय योजना करण्याचा आदेश न्यायालयाने शासनाला दिला होता. त्याला अनेक महिने झाले; पण परिवहन विभागाने अहवाल तयार करण्याव्यतिरिक्त काहीही केले नाही. आता अहवाल देण्याची वेळ आली. तेव्हा डिसेंबरच्या मध्याला परिवहन विभागाच्या सचिवांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस आयुक्तालयातील वाहतूक उपायुक्त यांची व्हिडिओ कॉन्फरन्स घेतली व त्यांनी राज्यभरात एकाच ठिकाणी अनेक अपघात झालेल्या ठिकाणी काय उपाय योजना केल्या याची माहिती घेतली. तेव्हा बहुतांश ठिकाणी केवळ ब्लॅक स्पॉट निश्चित करण्यात आले होते. त्यावर काहीही काम झाले नव्हते. त्यामुळे त्यावर तातडीने उपाय योजना करण्याचे आदेश देण्यात आले.

पुणे शहरात गेल्या ३ वर्षांत पाचपेक्षा अधिक अपघात झाले असे २२ ब्लॅक स्पॉट असून, पुणे जिल्ह्यात त्यांची संख्या ५१ आहे. या ठिकाणी काहीही काम झालेले नाही. त्यामुळे १५ जानेवारीच्या आत या ठिकाणी नेमक्या काय उपाय योजना करायच्या हे निश्चित करून त्याप्रमाणे काम सुरू करण्याचे आदेश सचिवांनी दिले. त्याचवेळी अपघात रोखण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करताना दुचाकीस्वारांचे अपघातात सर्वाधिक मृत्यू होतात. हेल्मेट वापरले तर अपघातातील मृत्यूचे प्रमाण कमी होईल, असे सुचविण्यात आले. त्यानुसार हेल्मेटसक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे समजते. हेल्मेटसक्ती आताच लागू करण्यामागे शासनाच्या तिजोरीत खडखडाट असून, मिळेल तेथून पैसे गोळा करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यातून दारुवरील करात नववर्षाच्या अगोदर वाढ करण्यात आली होती. हेल्मेटसक्ती करण्यामागेही हेच कारण असल्याचा आरोप हेल्मेटविरोधी कृती समितीने केला आहे. त्यांच्या आरोपाला आधारही आहे. एकट्या पुण्याचा विचार केला तर ६ डिसेंबर ते ३ जानेवारी या काळात वाहतूक पोलिसांनी तब्बल ३ कोटी ७० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई केली आहे. ही एकट्या पुणे शहरातील आहे.

पुणे शहरात २०१८ मध्ये २४० प्राणघातक अपघात झाले होते. त्यात २५३ जणांचा मृत्यू झाला होता. त्या २५३ पैकी १८४ जण दुचाकीस्वार होते. त्यांनी हेल्मेट घातले असते तर त्यांचा प्राण वाचू शकला असता असा दावा पोलिसांकडून केला जातो. यंदा प्राणघातक अपघात ५० टक्के कमी करण्याचा प्रयत्न असल्याचे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी जाहीर केले आहे. पोलीस आयुक्तांनी केलेला निर्धार चांगला आहे; पण तो केवळ हेल्मेटसक्तीनेच साध्य होऊ शकतो हे अर्धसत्य वाटते. प्रत्यक्ष वास्तवातील परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. दुचाकीस्वारांचे हे अपघात होतात, त्यातील बहुतांश अपघात हे रस्त्यावरील वाहतूक कमी झालेली असताना, रात्री ८ नंतर व पहाटेच्या वेळेस झालेले आहेत. तेही ज्या रस्त्यावर दुचाकी वाहने वेगाने जातात त्याठिकाणी हे अपघात झाले आहेत. दिवसभर हेल्मेटसक्ती राबविल्यानंतर तरुणाई रात्री रस्त्यावर पोलीस नसताना हेल्मेट घालेलच असे नाही. त्यामुळे वेगाने जाताना दुभाजकाला धडकून, गाडी सि.प होऊन झालेल्या अपघातातील काही जणांचे प्राण वाचू शकतील, हे नक्की. अपघात कधी होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे स्वत:च्या सरंक्षणासाठी हेल्मेट वापरणे आवश्यक आहे. हेही खरे आहे. पण त्यासाठी जबरदस्ती केल्याने आणखी नवे प्रश्न निर्माण होतील त्याचा या सक्तीत विचार केला गेलेला नाही.

शहरात सध्या सिमेंटचे रस्ते करण्याची टुम निघाली आहे. या रस्त्यावर अपघात झाल्यास डोक्याला लागल्यास मृत्यु येणे अटळ म्हणावे लागेल्ल मात्र, शहरातील हे रस्ते हेल्मेट घालून बाईक चालविण्याइतके सुरक्षित निश्चितच नाही. सिमेंटचा रस्ता असल्याने वाहनचालका बऱ्या पैकी वेगात असतात. या रस्त्यांवर सव्हिस लाईनसाठी काही अंतरावर सिमेंट ब्लॉक लावलेले असतात. हे काही दिवसातच खाली वर होतात. त्यातून वेगाने जाणाऱ्या दुचाकीस्वाराला हलकासा झटका बसतो. हेल्मेट डोक्यावर असेल तर हा हलकासा झटका नकळत मानेला बसत असतो.

शहराच्या उपनगरामध्ये अजूनही रस्ते म्हणजे दिव्य अशी परिस्थिती आहे. काही ठिकाणी तर स्प्रिडब्रेकर म्हणून डांबराचा मोठा ढिग उभा केलेला असतो आणि हेही थोड्या थोड्या अंतरावर असे अशास्त्रीय अनेक स्पिडब्रेकर टाकलेले दिसून येतात. त्याबरोबर रस्त्यावर आडवे खोदकाम केल्याने जागोजागी रस्त्यांवर लांबलचक खड्डे पडलेले असतात. या रस्त्यांवरील स्पिडब्रेकर ओलांडून जाताना ते स्पिडब्रेकर नाही तर व्हाईकिल ब्रेकर असल्याचे वाटते. यावरुन जाताना हेल्मेटचा भार सहाजिकच मानेवर येतो. कात्रज -कोंढवा - उरुळी या बायपास रोडचे एक उदाहरण घेतले तर आपल्या लक्षात येईल हा रस्ता नक्की कोठे आहे व खड्डा कोठे आहे हे शोधावे लागते. अशा रस्त्यावरुन दिवसातून दोनदा जाणाऱ्या व डोक्यावर हेल्मेट बाळगत जाणाऱ्या दुचाकीस्वारांना काही महिन्यात नक्कीच मानेचा व पाठीच्या मणक्याचा त्रास होऊ शकेल अशी एकंदर रस्त्याची परिस्थिती आहे. त्यामुळे एकीकडे हेल्मेटसक्तीमुळे काही प्राणघातक अपघात कमी होतीलही पण त्याचवेळी वर्षभरात काही हजार लोकांना कायमचे मानेचे व पाठीचे दुखणे मागे लागेल, या वास्तवाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. हेल्मेटसक्तीचा विचार करताना याबाबींकडेही दुर्लक्ष करुन जाणार नाही.

## घरगुती सिलिंडरमधून गॅसची चोरी


**कल्याण** - घरगुती सिलिंडरमधील गॅस चोरून तो कमर्शियल सिलिंडरमध्ये भरून त्याची वाढीव दराने विक्री करण्याचा धक्कादायक प्रकार कल्याण क्राइम ब्रँचने टाकलेल्या छाप्यातून डोंबिवलीत उघडकीस आला आहे. डोंबिवली पूर्वेतील पेंढारकर महाविद्यालयाच्या मागच्या बाजूस असलेल्या या गॅस गोदामामधून ही चोरी सर्रासपणे केली जात होती.



या गॅस गोदामामध्ये गॅसचोरी करून बाजरात विक्री केली जात असल्याची माहिती कल्याण क्राइम ब्रँचला मिळाली होती. त्यानुसार गुरुवारी सकाळी याठिकाणी छापा टाकला असता घरगुती गॅस सिलिंडरमधून गॅसची चोरी सुरू असल्याचे दिसून आले. एका लोखंडाच्या नळीद्वारे घरगुती सिलिंडरमधून गॅस काढून तो कमशिऱ्यल सिलिंडरमध्ये भरला जात होता. या नळीद्वारे अवघ्या १० सेकंदात दोन किलो गॅसची चोरी केली जाते. चोरून काढलेला गॅसमधून कमशिऱ्यल सिलिंडर भरून या सिलिंडरची बाजारात विक्री केली जाते. घरगुती सिलिंडरपेक्षा कमशिऱ्यल सिलिंडरची किंमत जास्त असल्याने हा गॅस भरण्यासाठी कमशिऱ्यल सिलिंडरची निवड केली जाते. कल्याण क्राइम ब्रँच टाकलेल्या धाडीत गॅस एजन्सीमधील १७जणांना ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी सुरू केली आहे.

## बेकायदेशीर ऑनलाइन लॉटरीचे रॅकेट उघडकीस

**नवी मुंबई : राज्यातील ९ जिल्ह्यांमध्ये सरकारी लॉटरीच्या आडून बेकायदेशीरपणे ऑनलाईन लॉटरी चालविणारे रॅकेट उघडकीस आले आहे. या प्रकरणी नवी मुंबई गुन्हे शाखेने विविध शहरांमधून ८ आरोपींना अटक केली असून संगणक, लॅपटॉपसह साहित्य जप्त केले आहे. या घोटाळ्यात सहभागी असलेल्या राज्यभरातील एजंटचीही पोलिसांनी धरपकड सुरू केली आहे.**




अटक केलेल्या आरोपींमध्ये मुख्य सुत्रधार उस्मान गणी हुसेन टिंडीक्कल याच्यासह अनिल पवार (ठाणे), अब्दुलकुदूस मोहम्मद याकुब शेख (नवी मुंबई), संदीप खुटे (नाशिक), रविंद्र घुगे(नाशिक), समिर आळंदकर(लातूर) व सचिन आचरेकर (रत्नागिरी) यांचा समावेश आहे. यामधील उस्मानने एका बोगस कंपनीकडून २ लाख रूपयांना साई लकी कूपन नावाने बोगस स्वॉफ्टवेअर करून घेतले. राज्यातील विविध शहरांमधील सरकारच्या गोल्डल, शुभलक्ष्मी व राजश्री या ऑनलाईन लॉटरी चालविणाऱ्या एजंटला भेटून त्यांना सरकारी लॉटरीपेक्षा दुप्पट पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखविले व त्यांना साई लकी कूपन ऑनलाईन लॉटरीसाठी लागणारी लिंक दिली. राज्यातील नाशिक, कोल्हापूर, रत्नागिरी, कराड, सातारा, औरंगाबाद, परभणी, लातूर, सिंधुदुर्ग सोलापूर, सांगली या जिल्ह्यांमध्ये एजंटचे जाळे पसरले होते.

याविषयी माहिती नवी मुंबई गुन्हे शाखेला मिळताच पोलीस आयुक्त संजय कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश कुलकर्णी यांच्या पथकाने कोपरखैरणेमधील लॉटरीकेंद्रावर धाड टाकून पवारला अटक केली. तपासादरम्यान राज्यभर हे रॅकेट पसरले असल्याचे निदर्शनास आले. गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पाच पथके तयार केली व राज्यभरातील आरोपींचे अटकसत्र सुरू केले. अटक केलेल्या ८ आरोपींकडू ५ संगणक, ६ लॅपटॉप, ३७ हार्डडिस्क, प्रिंटर व इतर साहित्य जप्त केले.

**८ जणांवर गुन्हा दाखल**

मुख्य आरोपी उस्मान टिंडीक्क. हा केरळ राज्यातील रहिवासी आहे. त्यानेच साई लकी कूपन नावाने सॉफ्टवेअर तयार करून सरकारमान्य लॉटरी सेंटरमध्ये एजंटच्या मदतीने लॉटरीचा व्यवसाय सुरू केला होता. या प्रकरणी महाराष्ट्र लॉटरी कायदा व महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमासह माहिती तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. या रॅकेटमध्ये राज्यातील अनेक एजंटचा समावेश असल्याचा संशय असून गुन्हे शाखा पुढील तपास करत आहे.

## महिला पोलिसावर पैसे भिरकावून असभ्य शेरेबाजी


**वसई :** वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने दंड आकारणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्यावर पैसे भिरकावून असभ्य शेरेबाजी करणाऱ्या तीन तरुणांना अटक करण्यात आली. पोलिसांनी या तरुणांवर गुन्हा दाखल केल्यानंतर न्यायालयाने त्यांना एक दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

३१ डिसेबरच्या रात्री वाहतूक पोलिसांनी शहरात बंदोबस्त ठेवला होता. त्यावेळी दुचाकीवरून जाणाऱ्या पंकज राजभर, सुमित वाघरी आणि विवेक सिंग या त्रिकुटावर पोलिसांनी कारवाई केली. त्यांच्याकडे वाहनांची कागदपत्रे नव्हती, तसेच त्यांनी हेल्मेट घातलेले नव्हते. त्यांना वाहतूक शाखेच्या कार्यालयात दंड जमा करण्यास सांगण्यात आले होते. बुधवारी दुपारी हे तिघे वाहतूक शाखेच्या अंबाडी रोड कार्यालयात आले. त्यांना ४ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. महिला कर्मचारी स्वाती गोपाली यांनी तडजोड करत २१०० रुपये दंड भरण्यास सांगितले. मात्र पंकज राजभर याने दोन हजारांची नोट काढून गोपाले यांच्या हातात न देता टेबलावर फेकली.

# घोडबंदरच्या कोंडीतून मार्ग

## मेट्रोसाठी आवश्यक ठिकाणीच मार्गरोधक; सेवा रस्त्यांवर खोदकामास तूर्तास परवानगी नाही

**ठाणे :** घोडबंदर मार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सेवा रस्त्यांवरील खोदकामे थांबविण्याबरोबरच मल आणि जलवाहिन्यांचे काम झालेल्या भागांवर आठ दिवसांत डांबरी रस्ता तयार करण्याचे आदेश महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी गुरुवारी दिले. कापुरबावडी ते गायमुखपर्यंतचे सेवा रस्ते अडविणारी गॅरेज बंद करण्याची कारवाई शुक्रवारपासून हाती घेण्याच्या आणि आवश्यक तिथेच मार्गरोधक लावून उर्वरित मार्ग मोकळा ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.




महापालिका अधिकारी, एमएमआरडीए आणि वाहतूक पोलिसांच्या बैठकीत आयुक्तांनी हे आदेश दिले. मेट्रोच्या कामासाठी मार्गरोधक लावल्यामुळे घोडबंदर रस्ता अरुंद झाला आहे. त्यात मल आणि जलवाहिन्यांच्या कामांसाठी सेवा रस्ते खोदले आहेत. त्यामुळे कोंडी होऊन पाच मिनिटांच्या अंतरासाठी दीड ते दोन तासांचा अवधी लागत आहे.

मेट्रो मार्गासाठी खांब उभारणी किंवा अन्य कामांसाठी आवश्यक असेल त्याच ठिकाणी मार्ग रोधक लावावेत. उर्वरित रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध करून द्यावा, अशा सूचना जयस्वाल यांनी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना दिल्या. महामार्गाच्या सेवा रस्त्यालगत ज्या ठिकाणी मल आणि जलवाहिन्या टाकण्याची कामे पूर्ण झाली आहेत, त्या ठिकाणी माती टाकून खड्डे बुजविण्यात आले आहेत. त्यामुळे या भागात धुळीचे प्रमाण प्रचंड वाढले असल्याचे त्यांनी बैठकीत सांगितले. सेवा रस्त्यांवरील धुळीचे प्रमाण कमी व्हावे आणि हे रस्ते वाहतुकीसाठी खुले व्हावेत यासाठी काम झालेल्या भागांत आठ दिवसांत डांबरी रस्ता तयार करण्याचे आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. अन्य कामेही लवकर पूर्ण करून त्या ठिकाणी डांबरीकरणाच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच सेवा रस्त्यांवर खोदकाम करण्यास तूर्तास परवानगी देणार नसल्याचे सांगत यापुढे सेवा रस्त्यांवरील खोदकामे थांबविण्याचे आदेश त्यांनी दिले.

## सिडकोच्या शिल्लक घरांसाठी ऑनलाइन नोंदणी; ३१ जानेवारीपर्यंत मुदत




**नवी मुंबई :** सिडकोने तळोजा, खारघर, कळंबोली, घणसोली व द्रोणागिरी नोडमधील ११०० शिल्लक घरांसाठी ऑनलाइन नोंदणी सुरू केली आहे. यासाठी ३१ जानेवारीपर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट यांच्याकरिता बांधण्यात आलेल्या १४,८३८ घरांसाठी सिडकोने ऑगस्टमध्ये सोडत काढली होती. या योजनेमधील ११०० घरे शिल्लक असून, त्यासाठी १ जानेवारीपासून ऑनलाइन नोंदणी सुरू केली आहे. यामधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या सदनिका केवळ प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र अर्जदारासाठी आहेत. अल्प उत्पन्न गटासाठीच्या सदनिका योजनेतील अटीनुसार पात्र ठरणाऱ्या अर्जदारांना वितरित करण्यात येणार आहेत. घरांसाठीचे अर्ज व सर्व माहिती सिडकोच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी मोबाइल ॲपही सुरू केले असल्याची माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली. ३० जानेवारीपर्यंत अर्ज नोंदणी करता येणार असून, ३१ जानेवारीपर्यंत अर्ज भरता येणार आहेत. १४ फेब्रुवारीला या योजनेकरिता सोडत काढण्यात येणार आहे.

## दिव्यात पादचाऱ्यांचा जीव मुठीत

**ठाणे** - वाहतुकीचे योग्य नियोजन व्हावे यासाठी ठाणे महापालिकेने दिवा शहरात नवे रस्ते उभारले असले तरी या रस्त्यांवर गतिरोधक नसल्याने रेल्वे स्थानक ते पोलीस चौकी मार्गावर वाहनांच्या वेगावर नियंत्रण राहिलेले नाही. गर्दीच्या आणि रहदारीच्या रस्त्यांवर गतिरोधक अथवा वेग नियंत्रण यंत्रणा उभारली जावी असा नियम आहे. दिव्यात मात्र नव्या रस्त्यांवर अशी व्यवस्था नसल्याने रेल्वे स्थानकाच्या दिशेने वेगाने वाहने हाकली जात आहेत. या रस्त्याच्या कडेला फेरीवाल्यांचे अतिक्रमण झाले आहे, त्यामुळे पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे.

दिवा शहरातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करत काही महिन्यांपूर्वी ठाणे महानगपालिकेने मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण केले. नवीन रस्ते बांधण्यात आले असले तरी सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना मात्र करण्यात आलेल्या नाहीत. साधारण महिनाभरापूर्वी दिवा रेल्वे स्थानक ते श्री गणेश सोसायटीपर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली. तेव्हापासून



वाहनचालक वेगमर्यादा ओलांडून, वाहतूक नियम धाब्यावर बसवून वाहने चालवत असल्याने या रस्त्यावर अपघात वाढले आहेत. येथील पदपथांवर जागोजागी फेरीवाल्यांचे अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यांच्या कडेने चालावे लागते. गतिरोधक नसल्यामुळे वाहनचालक वाहने भरधाव चालवतात. गेल्या आठवड्यात रिक्षाच्या धडकेत एका शाळकरी मुलीचा मृत्यू झाला. त्यामुळे रहिवासी संघटनांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. या घटनेला आठवडा उलटल्यानंतरही सत्ताधारी आणि पालिका प्रशासनाने कोणतीही पावले उचललेली नाहीत. या रस्त्यावर लवकरात लवकर गतिरोधक बसवण्यात यावेत, अशी मागणी स्थानिकांडून करण्यात येत आहे.

# 'केरळ बंद'ला हिंसक वळण

**तिरुअनंतपुरम-** शबरीमला मंदिराच्या गाभाऱ्यात दोन महिलांनी प्रवेश केल्याचे तीव्र पडसाद गुरुवारी केरळमध्ये उमटले. हिंदुत्ववादी संघटनांनी या कृत्याचा जोरदार निषेध नोंदवला. हिंदुत्ववादी संघटनांनी पुकारलेल्या १२ तासांच्या 'बंद'ला अनेक ठिकाणी हिंसक वळण लागले. केरळमध्ये ठिकठिकाणी रस्ते अडवून निदर्शने करण्यात आली, टायर जाळण्यात आले. या हिंसाचारप्रकरणी तातडीने अहवाल देण्याचे आदेश राज्यपाल पी. सतशिवम यांनी मुख्यमंत्री पिनरई विजयन यांना दिले आहेत. 'बंद'दरम्यान काही जिल्ह्यांमध्ये पत्रकारांवर हल्ले करण्यात आल्याने भाजप आणि शबरीमला कर्म समिती यांच्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय पत्रकारांच्या संघटनेने घेतला.

गुरुवारी पुकारण्यात आलेल्या बंदमुळे बससेवा वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. भाजप आणि



आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयांना आणि पक्षाच्या नेत्यांच्या घरांना लक्ष्य केले. थ्रिसूरमध्ये कार्यकर्त्यांमधील वादाने उग्र रूप धारण केले. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या कार्यकर्त्यांनी भाजपच्या तीन कार्यकर्त्यांना भोसकले. बुधवारी सुरू झालेले आंदोलन गुरुवारी आणखी तीव्र झाले. दरम्यान, माकपच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या दगडफेकीत जखमी झालेले ५५ वर्षीय चंद्रन उन्नीथन यांचा बुधवारी रात्री उशिरा मृत्यू झाला.

याप्रकरणी नऊ आरोपींची ओळख पटली असून दोघांना अटक केल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, देवस्थानाविरोधात दाखल करण्यात आलेल्या अवमान याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला. शबरीमला मंदिरामध्ये महिलांच्या प्रवेशानंतर तेथील पुजाऱ्यांनी शुद्धिकरणासाठी तासभर मंदिर बंद केल्याप्रकरणी केरळचे मुख्यमंत्री पिनरई विजयन यांनी जाहीररित्या नाराजी व्यक्त केली. 'महिला प्रवेशासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अय्यप्पा मंदिराच्या मुख्य पुजाऱ्यांना स्वीकारायचा नव्हता, तर त्यांनी आपले पद सोडायला हवे होते', असे विजयन म्हणाले.

# बिल मिळालं नाही तर जेवण फुकट, रेल्वेचा महत्त्वपूर्ण निर्णय

रेल्वेत प्रवास करताना जर तुम्हाला जेवणाचं बिल मिळालं नाही तर ते जेवण फुकट असणार आहे. रेल्वेनकडून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. मार्च महिन्यापासून सर्व प्रवाशांना दिसेल अशा पद्धतीने जेवणाच्या किंमती दर्शवणारा तक्ता लावण्यात येणार आहे. यावेळी त्या तक्त्यावर एक महत्त्वाचा संदेश लिहिला असेल तो म्हणजे, 'कृपया टीप देऊ नका, जर बिल मिळालं नाही तर तुमचं जेवण फुकट असणार आहे'. रेल्वेमधील कॅटरिंग सेवेत पारदर्शकता यावी यासाठी केंद्रीय रेल्वेमंत्री पियूष गोयल यांनी हा निर्णय घेतला आहे.

रेल्वेमंत्री पियूष गोयल यांची रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक पार पडली. यावेळी पियूष गोयल यांनी प्रवाशांना तक्रार नोंदवण्यासाठी एकच हेल्पलाइन क्रमांक सुरु करण्याचा आदेश दिला. यासाठी जानेवारी २०१९ पर्यंत



वेळ देण्यात आला आहे. तसंच यावेळी त्यांनी रेल्वे स्थानकांवर मिळणाऱ्या वाय-फाय सुविधेचा विस्तार करण्यावर जोर दिला. सध्या ७२३ रेल्वे स्थानकांवर वाय-फायची सुविधा मिळत असून हा आकडा २००० पर्यंत नेण्यात यावा असं पियूष गोयल यांनी म्हटलं आहे. यासोबतच स्थानकांवर जलदगतीने वाय-फायचं काम पूर्ण करुन घेणाऱ्या विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना बक्षीस देण्याची शिफारस त्यांनी यावेळी केली. पियूष गोयाल यांनी सर्व ट्रेनमधील कॅटरिंग स्टाफला आणि टीटीई यांना पीओएस पॉईंट ऑफ सेल मशीन वितरीत करण्याचा सल्ला दिला आहे. या मशीनमध्ये स्वाइप करण्याची तसंच बिल जनरेट करण्याची सुविधा असेल. यामुळे जेवणासाठी जास्त किंमत आकारणाऱ्या कॅटररविरोधात होणाऱ्या तक्रारींची दखल घेण्यासही मदत मिळेल.

# उत्तर प्रदेशात भाजपाचा मार्ग खडतर, 'बुआ-भतिजा' येणार एकत्र

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशात राजकीय समीकरणे बदलणार आहेत. उत्तर प्रदेशात 'बुआ- भतिजा' जोडी म्हणजे अखिलेख यादव आणि मायावती एकत्र येणार आहेत. आगामी



लोकसभा निवडणुकीत आघाडी करण्याविषयी समाजवादी पार्टी आणि बहुजन समाज पार्टीमध्ये एकमत झाले आहे. समाजवादी पार्टीच्या नेत्याने शनिवारी ही माहिती दिली. या महिना अखेरीस या गठबंधनची औपचारिक घोषणा होईल असे सपाचे राष्ट्रीय प्रवक्ते राजेंद्र चौधरी म्हणाले. सपा आणि बसपा जनाधार असलेले उत्तर प्रदेशातील प्रमुख पक्ष आहेत. या प्रादेशिक आघाडीमुळे भाजपाची २०१९ लोकसभा निवडणुकीसाठी ठरवलेली समीकरणे बिघडू शकतात. ही आघाडी प्रत्यक्षात आल्यास भाजपाला मोठा फटका बसू शकतो. मागच्या २०१४ लोकसभा निवडणुकीच्यावेळी उत्तर प्रदेशातून भाजपाने ८० पैकी तब्बल ७१ जागांवर विजय मिळवला होता. त्यावेळी देशभरात मोदी लाट होती. आता अशी परिस्थिती नाही. प्रस्थापित सरकारविरोधात सर्वच मतदार अनुकूल नसतात. त्यामुळे या परिस्थितीत उत्तर प्रदेशातून भाजपाला अपेक्षित जागा जिंकता आल्या नाहीत तर भाजपाचा केंद्रात सरकार बनवण्याचा मार्ग अधिक खडतर होऊ शकतो. समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव आणि बसपाच्या सुप्रीमो मायावती यांच्यात अनेक फेऱ्यांची चर्चा झाल्यानंतर दोन्ही नेत्यांनी आघाडी करण्याला प्राथमिक मान्यता दिली आहे. दोन्ही नेत्यांची शुक्रवारीच भेट झाली. अन्य पक्षांसोबतही चर्चा सुरु आहे असे राजेंद्र चौधरी म्हणाले. काँग्रेसला या आघाडीत स्थान मिळणार का ? या प्रश्नावर चौधरी यांनी तो निर्णय अखिलेश यादव आणि मायावती घेतील असे सांगितले.

# ...म्हणून राज यांनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट



मुंबई- शिवसेना आणि मनसेमध्ये नेहमीच राजकीय कुरघोडी पाहायला मिळत असली तरी या दोन्ही पक्षांच्या प्रमुखांनी राजकारणापलीकडे जाऊन कौटुंबिक नाते जपले आहे आणि या नात्यानेच राज ठाकरे यांची पावले आज पुन्हा एकदा 'मातोश्री' निवासस्थानाकडे वळली.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित यांचा विवाह २७ जानेवारी रोजी मुंबईत संपन्न होत असून या लग्नाचं आमंत्रण देण्यासाठी राज आज बंधू आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी मातोश्री निवासस्थानी दाखल झाले. राज यांनी उद्धव व संपूर्ण कुटुंबाला लग्नाचं आग्रहाचं आमंत्रण दिलं. त्यानंतर जयदेव ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांनाही राज यांनी निमंत्रण दिलं. राज ठाकरे यांच्या घरी लग्नाची लगबग सुरू झाल्यानंतर यजमान म्हणून विशेष पाहुण्यांना आमंत्रण देण्याची जबाबदारी राज यांनी स्वत:कडे घेतली आहे. यात उद्योगपती रतन टाटा यांना त्यांनी सर्वात आधी निमंत्रण दिलं. त्यानंतर आज उद्धव, जयदेव यांना आमंत्रण देणारे राज येत्या काही दिवसांत दिल्लीतही जाण्याची शक्यता आहे. दिल्ली भेटीत ते काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांना विवाहासाठी आमंत्रण देतील, असे सांगितले जात आहे. राहुल-राजभेटीचं नियोजन मिलिंद देवरा हे करत असल्याचेही वृत्त आहे. याशिवाय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच अन्य काही मोजक्या मान्यवरांना राज निमंत्रण देतील, असे कळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राज यांचे निमंत्रण जाणार का, याबाबत मात्र अजूनही साशंकता आहे.

# पुण्यात मेट्रोची भलीमोठी ड्रील मशीन भररस्त्यात कोसळली

**पुणे-** पिंपरी चिंचवडच्या नाशिक फाटा येथे शनिवारी दुपारी मेट्रोचे काम सुरु असताना खड्डे पाडणारी भली मोठी ड्रिल मशीन रस्त्यावर कोसळली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. नेमका हा प्रकार कसा घडला हे अस्पष्ट आहे. मात्र मेट्रोचा हा भोंगळ कारभार पाहून संताप व्यक्त केला जातोय. या घटनेमुळे काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. दैव बलवत्तर असल्याने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. हा मुंबई पुणे जुना महामार्ग आहे त्यामुळे इथे नेहमी वाहनांची वर्दळ असते. शनिवारी दुपारी अचानक भली मोठी ड्रिल मशील थेट रस्त्यावर कोसळली. त्यामुळे मेट्रोचे काम सुरु असताना नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न



निर्माण झाला आहे. या अपघातात जिवीत व वित्तहानी झालेली नाही. ही एक दुर्दैवी घटना असून याची चौकशी करण्यात येईल असे महाराष्ट्र मेट्रोकडून सांगण्यात आले आहे.

सुरक्षा नियमांचे पालन करण्यासंदर्भात कंत्राटदारांना कठोर इशारा देण्यात येईल असे मेट्रोकडून सांगण्यात आले आहे. वाहतूक व्यवस्था पूर्ववत करण्यासाठी महाराष्ट्र मेट्रोकडून सर्व प्रयत्न करण्यात येत असून पुढच्या काही तासात वाहतूक पूर्वपदावर येईल असे मेट्रोकडून सांगण्यात आले आहे. महाराष्ट्र मेट्रोचे सुरक्षा अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत.

# ५ वर्षात २७ उद्योगपती कर्ज बुडवून फरार, मोदी सरकारची माहिती

विजय मल्ल्या, नीरव मोदीप्रमाणे बँकांची कर्जे बुडवून देशातील २७ उद्योगपती विदेशात फरार झाले आहेत. या २७ आरोपींपैकी २० जणांविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस जारी करन्यासाठी भारताने इंटरपोलशी संपर्क केला होता, अशी माहिती केंद्रीय अर्थ राज्यमंत्री शिवप्रताप शुक्ला यांनी शुक्रवारी लोकसभेत दिली. शुक्ला म्हणाले, इंटरपोलच्यावतीने यातील ८ जणांना रेड कॉर्नर नोटीसा पाठविण्यात आली आहे. यापैकी ६ जणांच्या प्रत्यार्पणाची मागणीही करण्यात आली आहे. अंमलबजावणी संचालनालयाच्या माहितीप्रमाणे आर्थिक गुन्हेगार कायदा-२०१८ नुसार ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे शुक्ला म्हणाले. ५० कोटीपेक्षा अधिक कर्ज घेणाऱ्या प्रमोटर्स आणि संचालकांच्या पासपोर्टच्या प्रमाणित प्रति जमा




करण्याचे आदेश सरकाने बँकांना दिले आहेत. तसेच लंडनमधील वेन्समिनस्टर मॅजिस्ट्रेट न्यायालयानेही विजय मल्ल्याच्या प्रत्यार्पणाचे आदेश युनाटेड किंगडमला दिले आहेत, अशी माहिती शुक्ला यांनी यावेळी दिली.



# मनमोहन सिंग यांच्यापेक्षा मिशेलला सरकारच्या कामकाजाबद्दल जास्त माहिती होती -नरेंद्र मोदी

राफेल डीलवरुन काँग्रेस मोदी सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही ऑगस्टा वेस्टलँड घोटाळयावरुन काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे. सत्तेत असताना काँग्रेसने सरकार चालवले की, आपल्या मिशेल मामाचा दरबार चालवला ते मला समजलेले नाही. देशाऐवजी दलालांचे हित जपण्यात ज्यांनी ज्यांनी भूमिका बजावली तपास पथक आणि देशाची जनता त्यांचा हिशोब करेल अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसवर टीका केली.

ओदिशा बारीपाडा येथे एका जनसभेला ते संबोधित करत होते. ३६०० कोटींच्या ऑगस्टा वेस्टलँड व्हीव्हीआयपी हेलिकॉप्टर घोटाळयातील आरोपी ख्रिश्चिअन मिशेलला दिल्ली कोर्टाने आज २६ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. ऑगस्टा वेस्टलँड घोटाळयात काँग्रेसचा चेहरा उघडा पडला आहे त्यामुळे काँग्रेसने राफेल डीलमध्ये चौकशीची मागणी लावून धरली आहे.

२००४ ते २०१४ दरम्यान देशांच्या संरक्षण दलांना कमकुवत करण्यासाठी जे कारस्थान रचण्यात आले ते सर्वांसमोर आहे. जेव्हा आमचे सरकार अशा कटकारस्थानांमधून सैन्यदलाची सुटका करण्याचा प्रयत्न करत आहे त्यावेळी आम्हाला लक्ष्य केले जातेय असे मोदी म्हणाले. मोदींनी आपल्या भाषणात २००९ साली मिशेलने लिहिलेल्या एका पत्राचाही उल्लेख केला. सरकारमध्ये उच्चस्तरावर काय घडामोडी चालू आहेत त्याची मिशेलला माहिती होती. पीएमओ, संरक्षण मंत्रालय आणि नोकरशाहीमध्ये काय चालू आहे ते मिशेलला सर्व समजत होते असा आरोप मोदी यांनी केला. कुठल्या फाईल्स कुठे पाठवल्या जात आहेत, कुठल्या फाईल्स पंतप्रधान कार्यालयापर्यंत पोहोचत आहेत त्याची मिशेलला खडानखडा माहिती होती. तत्कालिन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यापेक्षा मिशेललाच सरकारच्या कामकाजाबद्दल जास्त माहिती होती असा आरोप पंतप्रधान मोदींनी केला.

# २० मिनिटं आधी पोहोचा अन्यथा ट्रेन सोडा

**नवी दिल्ली - विमानतळांप्रमाणे आता रेल्वे स्थानकांचीही कडेकोट सुरक्षा करण्याची रेल्वेची योजना आहे. या योजनेनुसार प्रवाशांना आपली गाडी पकडण्यासाठी १५ ते २० मिनिटं आधीच रेल्वे स्थानकावर यावं लागेल. सुरक्षेचे सर्व टप्पे पूर्ण केल्यानंतरच त्यांना रेल्वे स्थानकात प्रवेश मिळेल. यामुळे उशीर झाल्यास प्रवाशांवर गाडी सोडण्याची वेळ येणार आहे.**

कुंभ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर अलाहाबाद रेल्वे स्थानकावर अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत अशी कडक सुरक्षा यंत्रणा बसवण्यात आली आहे. कर्नाटकमधील हुबळी रेल्वे स्थानकातही अशाच प्रकारची सुरक्षा व्यवस्था आहे. आता देशातील तब्बल २०२ रेल्वे स्थानकांमध्ये अशी सुरक्षा व्यवस्था अंमलात आणण्याची तयारी रेल्वेने सुरू केली आहे. रेल्वे सुरक्षा दलाचे (RPF) महासंचालक अरुण



कुमार यांनी ही माहिती दिली. रेल्वे स्थानक सर्वबाजूंनी सुरक्षित केले जाईल. तसंच स्थानकाची प्रवेशद्वारे किती आहेत आणि त्यातील किती प्रवेशद्वारं बंद करता येतील, हे पूर्ण अभ्यासानंतर ठरवण्यात येणार आहे. अनावश्यक आणि खुले मार्ग कायम स्वरूपी भिंती उभारून बंद केले जातील. उर्वरीत प्रवेशद्वारांवर रेल्वे सुरक्षा दलाचे जवान तैनात असतील, असं अरुण कुमार म्हणाले.

रेल्वे स्थानकाच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर तपासणीचे टप्पे असतील. तपासणीचे सर्व टप्पे पार केल्यावरच प्रवाशांना आत प्रवेश देण्यात येईल. यामुळे विमानतळांप्रमाणे प्रवाशांना आपली गाडी सुटण्याच्या वेळेच्या किमान १५ ते २० मिनिटं आधीच रेल्वे स्थानकाच पोहोचावं लागेल, असं त्यांनी सांगितलं.


ज्या २०२ रेल्वे स्थानकांवर सुरक्षेची योजना आखण्यात आली आहे, तिथे इंटिग्रेटेड सेक्युरिटी सिस्टीम (ISS) ही सुरक्षा यंत्रणा उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. ISS या सुरक्षा यंत्रणेत सीसीटीव्ही कॅमेरे, बॅग स्क्रिनिंग, बॉम्ब शोधक आणि नाशक यंत्रणा अशा सर्वांचा समावेश आहे. घ्एए ही संपूर्ण यंत्रणा रेल्वे स्टेशनच्या प्रवेशद्वारांवर असेल. रेल्वे स्थानकांच्या या सुरक्षा यंत्रणेसाठी ३८५.०६ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. एवढचं नव्हे तर रेल्वे स्थानक परिसरात प्रवासी दाखल होताच, त्याची तपासणी करण्यात येईल. प्रवाशाच्या चेहऱ्याची ओळख पटवणारं रिअल टाइम सॉफ्टवेअरही असणार आहे. यात एखादा गुन्हेगार आढळून आल्यास यंत्रणा लगेच ॲलर्ट होतील, अशी माहिती अरुण कुमार यांनी दिली.

# शेतकऱ्यांच्या खात्यात मोदी सरकार पाठवणार १०,००० रुपये?; प्रजासत्ताक दिनी होणार घोषणा

**नवी दिल्ली-** 'मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांमध्ये झालेल्या पराभवाचं आम्ही चिंतन करतोय आणि पुढची आखणी-नियोजन यावरही काम सुरू आहे', असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतंच एएनआयला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं होतं. त्यावरून, येत्या लोकसभा निवडणुकीआधी काहीतरी मोठी घोषणा मोदी सरकार करू शकतं, याचे संकेत मिळाले होते. हा अंदाज खरा ठरला असून, देशातील गरजू, गरीब शेतकऱ्यांच्या खात्यात १० हजार रुपये जमा करण्याच्या योजनेवर काम सुरू असल्याचं वृत्त 'इटी नाऊ'ने दिलं आहे. ओडिशा सरकार आपल्या राज्यातील गरीब-गरजू शेतकऱ्यांना दहा हजार रुपयांची वार्षिक मदत देतं. हे पैसे त्यांच्या खात्यात जमा होतात. त्यातून शेतकरी बियाणं, खतं, शेतीसाठी लागणारी सामग्री खरेदी करू शकतो. One Household One Incentive असं या योजनेचं नाव आहे. ही योजना देशपातळीवर सुरू करण्याबाबत पंतप्रधान कार्यालय अर्थ आणि कृषि खात्याच्या संपर्कात आहे. ओडिशा सरकार या योजनेसाठी १.४ लाख कोटी रुपये खर्च करतं. तेलंगणामध्येही गरजू शेतकऱ्यांच्या खात्यात चार हजार रुपये जमा केले जातात. त्यासाठी सरकारला २ लाख कोटी रुपयांची तरतूद करावी लागते. परंतु, त्यांनी ही योजना यशस्वीपणे राबवली आहे. One Household One Incentive या योजनेत भूमिहीन



शेतकऱ्यांना समाविष्ट केलं जाणार नाही. त्यांच्यावर कर्जाचं ओझं नसल्यामुळे त्यांच्यासाठी ही योजना लागू नसेल. प्रजासत्ताक दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी या 'महामदत पॅकेज'ची घोषणा करू शकतात. त्याशिवाय, ग्रामविकासाशी संबंधित एखादी योजनाही या दिवशी जाहीर केली जाऊ शकते.




आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर नि:शुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)